


# शासकीय तंत्रनिकेतन पेण

रामवाडी, शिवाजीनगर, पेण, जि. रायगड. ४०२१०७
वेबसाईट : www.gppen.ac.in
ई–मेल – office.gppen@dtemaharashtra.gov.in

शासकीय तंत्रनिकेतन पेण ही महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत १९९० साली स्थापन झालेली एक नामांकित संस्था आहे. संस्थेमध्ये दहावीनंतर तीन वर्ष मुदतीचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (A.I.C.T.E.,New Delhi) मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम (Diploma in Engineering Programs) राबविले जातात. हे सर्व अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई (Maharashtra State Board of Technical Education, Mumbai - www.msbte.ac.in) यांच्याशी संलग्नित आहेत. सद्यस्थितीत संस्थेमध्ये खालील अभ्यासक्रम राबविले जात आहेत .

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | स्थापनेचे वर्ष |
|---|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) | ६० | १९९० |
| २ | यंत्र अभियांत्रिकी पदविका (Diploma in Mechanical Engineering) | ६० | १९९० |
| ३ | उपकरणीकरण व नियंत्रण अभियांत्रिकी पदविका (Diploma in Instru. & Control) | ४० | १९९५ |
| ४ | रासायनिक अभियांत्रिकी पदविका (Diploma in Chemical Engineering) | ४० | १९९६ |
| ५ | संगणक तंत्रज्ञान पदविका (Diploma in Computer Technology) | ६० | २००७ |
| | एकूण | २६० | |

## संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

- निसर्गसंपन्न परिसर, प्रशस्त इमारती आणि सुसज्ज प्रयोगशाळा.
- अनुभवी व उच्चशिक्षित शिक्षक आणि अनुभवी व प्रशिक्षित कर्मचारी.
- शिक्षण पूरक उपक्रम : शैक्षणिक सहली, औद्योगिक तज्ञांची (Industry Experts) व्याख्याने, तांत्रिक विषयांवरील स्पर्धा.
- सुसज्ज ग्रंथालय : क्रमिक व संदर्भ पुस्तके, विविध संशोधन पत्रिका, गरजू विद्यार्थ्यांकरिता (Book Bank) सुविधा .
- पात्र विद्यार्थ्यांना महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती उपलब्ध आहेत.
- माफक शैक्षणिक शुल्क (अंदाजे) : प्रवर्ग- Open-7750/- EWS,OBC-4750/- TFWS,SC,ST,VJ,NT,SBC-1750/-
- प्रशिक्षण व आस्थापना विभाग : Campus Placement मधून ITC, JSW Steel, Bajaj Auto, Godrej, Cipla, Voltas, TATA Steel, L&T, Gharda Chemicals, Hindalco Industries, Cummins India, Thyssenkrupp Industries, Grasim इ. नामांकीत कंपन्यांमध्ये दरवर्षी १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना उज्वल भविष्य घडविण्याची संधी.
- जिमखाना व खेळांच्या स्पर्धा : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संस्थेतील जिमखान्यात विविध खेळांचे साहित्य उपलब्ध आहे.
- विद्यार्थी सहकार भांडार : आवश्यक शैक्षणिक साहित्य / स्टेशनरी विद्यार्थी सहकार भांडार येथे माफक दरात उपलब्ध.

## संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून राबविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत अभ्यासक्रम.
- विद्यार्थांच्या नियमित उपस्थिती व शैक्षणिक सहभागाचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन.
- बारा आठवड्यांचे प्रत्यक्ष Industry मध्ये औद्योगिक प्रशिक्षण.
- द्विभाषिक (इंग्रजी व मराठी) माध्यमामध्ये शिक्षण व परिक्षेमध्ये उत्तरे लिहिण्याची मुभा.

## तंत्रनिकेतन प्रवेश प्रक्रियेची माहिती

महाराष्ट्रातील अभियांत्रिकी पदविका प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडून सामायिक प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. ही प्रक्रिया ऑनलाईन प्रकारची असून यामध्ये उमेदवारास प्रत्येक तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) साठी वेगळा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही.

## प्रवेश प्रक्रियेचे मुख्य टप्पे :

१) ऑनलाईन अर्ज विहित शुल्क भरून सुविधा केंद्रावर (FC) अर्ज निश्चिती करणे.
२) ऑनलाईन विकल्प (Option Form) अर्ज भरणे. यामध्ये आपल्याला हवे असलेले तंत्रनिकेतन व हवा असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती पसंती क्रमाने भरणे.
३) आपल्याला कोणती तंत्रनिकेतन संस्था व कोणता अभ्यासक्रम मिळाला ते ऑनलाईन पाहणे.
४) प्रवेश निश्चिती केंद्रावर जाऊन प्रवेश निश्चित करणे. (ARC)
५) मिळालेल्या तंत्रशिक्षण संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करणे.

टीप : प्रवेश प्रक्रियेसंबंधी पात्रता नियम व संपूर्ण माहिती www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेच्या वेळी प्रसिद्ध केली जाते.

## तंत्रनिकेतन प्रवेशासाठी प्रवर्गनिहाय आवश्यक प्रमाणपत्रे

१) इयत्ता दहावीचे गुणपत्रक / प्रमाणपत्र .
२) शाळा सोडल्याचा दाखला . (T.C./L.C.)
३) राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र .
४) जात प्रमाणपत्र .
५) सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी (S.C./S.T. सोडून) ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र.
६) E.W.S प्रवर्गासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
७) अल्पसंख्याक प्रवर्गाचे प्रमाणपत्र.
८) दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
९) सैन्य दलातील सवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र .

प्रा. डी.जी. पंडित – ८१६९०३९६२२ । प्रा. डी.डी. गंगथडे ९९७०३६१३८३